**<u>नियमीत दिवाणी दावा क्र. ५७/२०१९ मधील निशाणी क्र.४६ वरील आदेश</u>**

प्रस्तूतचा अर्ज वादीने दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश १ नियम १० आणि आदेश ६ नियम १७ अन्वये दाव्यात दुरुस्ती करण्यास परवानगी मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्ज व त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे वाचले. दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकला.

३. वादीने असे कथन केले की, दावा दाखल करतेवेळी अनावधानाने पक्षकारांची नावे दाव्याचे सरनाम्यात नोंद करण्याचे राहून गेले आहे. दाव्याचे चौकशीकामी तांत्रिक दोष राहू नये म्हणून पक्षकारांना दाव्याकामी सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे वादीने अर्ज मंजूर करण्याची मागणी केली.

४. प्रतिवादीतर्फे अर्जास म्हणणे दाखल करुन हरकत घेतली. प्रतिवादींचे असे कथन केले की, अर्जातील नमुद कारण योग्य व संयुक्तिक नाही. महसुल अभिलेखात नियोजीत प्रतिवादींची नावे नमुद असल्यामुळे अनावधानाने दाव्याचे सरनाम्यात पक्षकारांची नावे सामील करण्याचे राहून गेले हे वादीचे कथन पटणारे नाही. प्रतिवादी यांनी यापूर्वी कैफियत दाखल करुन आवश्यक पक्षकारांचा मुद्दा उपस्थित केला आहे. त्यानंतर ब–याच कालावधीनंतर वादीने सदरहू अर्ज दाखल केला आहे. त्यामुळे प्रतिवादींनी अर्ज नामंजूर करण्याची व वैकल्पिकरित्या खर्चाची मागणी केली.

५. वादीने प्रस्तुत दावा वाटपाकरीता दाखल केलेला आहे. अशावेळी दाव्याची गुंतागुंत टाळण्याकरीता व दाव्याचा अंतिम निर्णय गुणावगुणांवर होणेकरीता प्रस्तावित दुरुस्ती करणे आवश्यक आहे. प्रस्तावित दुरुस्ती ही तांत्रिक स्वरुपाची असल्याने दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. प्रस्तावित दुरुस्तीमुळे प्रतिवादींचे नुकसान होणार नाही. तसेच प्रतिवादींना

त्यांची बाजू मांडण्याची संधी उपलब्ध आहे. वादीने अर्ज कलम ३ मध्ये नमुद केलेले पक्षकार दाव्याचे कामी आवश्यक पक्षकार असल्यामुळे त्यांना दाव्यात सामील करणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करणे न्यायोचीत होईल. म्हणून मी पुढील आदेश पारीत करतो.

## आ दे श

१) निशाणी क्र.४६ कडील अर्ज मंजूर करण्यात येतो.

२) निशाणी ४६ कडील अर्जान्वये दाव्यात दुरुस्ती करावी व पुढील तारखेपर्यंत दुरुस्त दाव्याच्या प्रती दाखल कराव्यात.

ठिकाण – वडूज
दिनांक – १८.०३.२०२१

(के. सी. माने)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर. वडूज